पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

**मा. शिक्षण समिती ( विशेष सभा )**

कार्यपत्रिका क्रमांक - १

**सभावृत्तांत**

दिनांक - **०९/०७/२०१८** वेळ - दुपारी **१.००** वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.शिक्षण समितीची पहिली सभा (विशेष सभा) **सोमवार** दिनांक **०९/०७/२०१८** रोजी दुपारी **१.००** वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस **मा.सुशील खोडवेकर (भा.प्र.से.)** प्रकल्प संचालक, महाराष्ट्र स्पर्धाक्षम कृषि विकास प्रकल्प, पुणे तथा पिठासीन प्राधिकारी व खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. मा.प्रा.सोनाली दत्तात्रय गव्हाणे
२. मा.बुर्डे सुवर्णा विकास
३. मा.बाबर शर्मिला राजू
४. मा.सोनवणे शारदा हिरेन
५. मा.तापकीर विनया प्रदीप (आबा)
६. मा.काळे उषा दिलीप
७. मा.अश्विनी गजानन चिंचवडे-पाटील

या शिवाय मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.शिंदे – प्रशासन अधिकारी ( प्राथमिक शिक्षण विभाग), मा.मुंढे – प्र.शिक्षणाधिकारी (माध्यमिक शिक्षण विभाग), हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

**मा.पिठासीन प्राधिकारी तथा प्रकल्प संचालक, महाराष्ट्र स्पर्धाक्षम कृषि विकास प्रकल्प पुणे.** – सन्मा.सदस्य, उपस्थित सर्व अधिकारी यांचे स्वागत करतो. आजच्या विशेष सभेत मा. शिक्षण समितीचे **सभापती** पदावर नेमणूक करणेचा विषय आहे. त्यासाठी मा.विभागीय आयुक्त यांनी सभेचा पिठासीन प्राधिकारी म्हणून माझी या ठिकाणी नेमणुक केलेली आहे.

मुक्त व निर्भयपणे मा.शिक्षण समितीच्या **सभापती** पदाची निवडणुक पार पाडण्यासाठी कामकाजाची लेखी नोंद घेण्याबरोबरच त्या कामकाजाची व्हिडिओ चित्रणाद्वारे देखील नोंद घेण्याची व्यवस्था ठेवणेत आलेली आहे.

**मी नगरसचिव यांना सभेचे कामकाज सुरु करण्याचे आदेश देतो.**

**मा.नगरसचिव -** मा. शिक्षण समितीचे **सभापती** पदावर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम ३० (३) नुसार नेमणूक करणे.

मा. शिक्षण समिती **सभापती** पदाकरीता मुदतीत दाखल झालेले एक नामनिर्देशनपत्र मा.पिठासीन प्राधिकारी यांजकडे छाननीकामी सुपुर्त करण्यात येत आहे.

**मा.पिठासीन प्राधिकारी तथा - प्रकल्प संचालक, महाराष्ट्र स्पर्धाक्षम कृषि विकास प्रकल्प पुणे.** पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या **सभापती**, शिक्षण समिती पदाकरीता एक नामनिर्देशनपत्र मुदतीत दाखल झाले आहे. त्यामध्ये उमेदवार त्यांचे सुचक, अनुमोदक यांची नावे पुढील प्रमाणे आहेत.

| अ.क्र. | उमेदवाराचे नांव | सुचकाचे नांव | अनुमोदकाचे नांव |
|---|---|---|---|
| ०१ | मा.प्रा.सोनाली दत्तात्रय गव्हाणे | मा.बाबर शर्मिला राजू | मा.बुर्डे सुवर्णा विकास |

मा.सभापती, शिक्षण समितीचे पदासाठी मुदतीत प्राप्त झालेल्या उपरोक्त एक नामनिर्देशन पत्राची छाननी करणेत आली असून ते नामनिर्देशनपत्र वैध ठरले आहे. त्यामध्ये शिक्षण समिती **सभापती** पदाची निवडणूक लढविणा-या **मा.प्रा.सोनाली दत्तात्रय गव्हाणे** या एकच रितसर वैधपणे नामनिर्देशित उमेदवार आहेत.

**- नामनिर्देशनपत्र माघारी घेणे –**

उमेदवारास १५ मिनिटांच्या आत त्यांनी सही केलेली लेखी नोटीस मा.पिठासीन प्राधिकारी यांजकडे देऊन त्यांची उमेदवारी मागे घेता येईल अशी नियमात तरतूद आहे. उमेदवारी मागे घेण्यासाठी १५ मिनिटांचा (दुपारी १.०८ ते १.२३ वा.) कालावधी देणेत येत आहे.

**- उमेदवार निवडून आल्याची घोषणा –**

नामनिर्देशनपत्र माघारी घेण्याचा कालावधी संपला आहे. या कालावधीमध्ये उमेदवाराने उमेदवारी मागे घेतलेली नाही. सबब मा.सभापती, शिक्षण समिती पदाची निवडणूक लढविणा-या **मा.प्रा.सोनाली दत्तात्रय गव्हाणे** या एकच रितसर वैधपणे नामनिर्देशित उमेदवार आहेत.

यास्तव **मा.प्रा.सोनाली दत्तात्रय गव्हाणे** यांची पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.शिक्षण समितीचे **सभापती** पदावर रितसर वैधरित्या बिनविरोध निवड झाल्याचे मी सुशील खोडवेकर, पिठासीन प्राधिकारी, शिक्षण समिती (विशेष सभा) जाहीर करतो.

----------

ठराव क्रमांक - १ विषय क्रमांक – १

दिनांक - ०९/०७/२०१८ विभाग – नगरसचिव

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.शिक्षण समिती **सभापती** पदासाठी मुदतीत दाखल झालेल्या व वैध ठरलेल्या एक नामनिर्देशन पत्रामधील मा.शिक्षण समिती **सभापती** पदाची निवडणूक लढविणा-या **मा.प्रा.सोनाली दत्तात्रय गव्हाणे** या एकच रितसर वैधपणे नामनिर्देशित उमेदवार असल्याने **मा.प्रा.सोनाली दत्तात्रय गव्हाणे** यांची पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या शिक्षण समितीचे **सभापती** पदावर रितसर वैधरित्या बिनविरोध निवड झाल्याचे जाहिर करणेत येत आहे.

---------

**सही/-**

**( सुशील खोडवेकर, भा.प्र.से. )**

पिठासीन प्राधिकारी तथा

प्रकल्प संचालक, महाराष्ट्र

स्पर्धाक्षम कृषि विकास प्रकल्प,

शिक्षण समिती (विशेष सभा)

पिंपरी चिंचवड महानगरपालिका

----------

(नवनिर्वाचित सभापती **मा.प्रा.सोनाली दत्तात्रय गव्हाणे** यांनी सभेचे अध्यक्षस्थान स्विकारले. )

**मा.नगरसचिव** - विषय क्र.२ - मा. शिक्षण उपसभापतीची नेमणूक करणे.
मा. शिक्षण समितीचे **उपसभापती** पदासाठी मुदतीत दाखल झालेले एक नामनिर्देशनपत्र मा.सभापती यांजकडे छाननीकामी सुपुर्द करणेत येत आहे.

**मा.सभापती** - पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या **उपसभापती,** शिक्षण समिती पदाकरीता एकच नामनिर्देशनपत्र मुदतीत दाखल झाले आहे. त्यामध्ये उमेदवार त्यांचे सुचक, अनुमोदक यांची नावे पुढील प्रमाणे आहेत.

| अ.क्र. | उमेदवाराचे नांव | सुचकाचे नांव | अनुमोदकाचे नांव |
|---|---|---|---|
| ०१ | मा.बाबर शर्मिला राजू | मा.बुर्डे सुवर्णा विकास | मा.प्रा.सोनाली दत्तात्रय गव्हाणे |

मा.उपसभापती, शिक्षण समितीचे पदासाठी मुदतीत प्राप्त झालेल्या उपरोक्त एक नामनिर्देशन पत्राची छाननी करणेत आली असून ते नामनिर्देशनपत्र वैध ठरले आहे. त्यामध्ये मा.शिक्षण समिती **उपसभापती** पदाची निवडणूक लढविणा-या **मा.बाबर शर्मिला राजू** या एकच रितसर वैधपणे नामनिर्देशित उमेदवार आहेत.

**- नामनिर्देशनपत्र माघारी घेणे –**

उमेदवारास १५ मिनिटांच्या आत त्यांनी सही केलेली लेखी नोटीस मा.सभापती, शिक्षण समिती यांजकडे देऊन त्यांची उमेदवारी मागे घेता येईल अशी नियमात तरतूद आहे. सर्व सभासदांच्या संमतीने उमेदवारी मागे घेण्यासाठी ५ मिनिटांचा (दुपारी १.२५ ते १.३० वा.) कालावधी देणेत येत आहे.

**- उमेदवार निवडून आल्याची घोषणा –**

नामनिर्देशनपत्र माघारी घेण्याचा कालावधी संपला आहे. या कालावधीमध्ये उमेदवाराने उमेदवारी मागे घेतलेली नाही. सबब मा.उपसभापती, शिक्षण समिती पदाची निवडणूक लढविणा-या **मा.बाबर शर्मिला राजू** या एकच रितसर वैधपणे नामनिर्देशित उमेदवार आहेत.

यास्तव **मा.बाबर शर्मिला राजू** यांची पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.शिक्षण समितीचे **उपसभापती** पदावर रितसर वैधरित्या बिनविरोध निवड झाल्याचे मी प्रा.सोनाली दत्तात्रय गव्हाणे, सभापती, शिक्षण समिती (विशेष सभा) जाहीर करते.

----------

ठराव क्रमांक - २ विषय क्रमांक - २

दिनांक - ०९/०७/२०१८ विभाग - नगरसचिव

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. शिक्षण समिती **उपसभापती** पदासाठी मुदतीत दाखल झालेल्या व वैध ठरलेल्या एक नामनिर्देशन पत्रामधील मा.शिक्षण समिती **उपसभापती** पदाची निवडणूक लढविणा-या **मा.बाबर शर्मिला राजू** या एकच रितसर वैधपणे नामनिर्देशित उमेदवार असल्याने **मा.बाबर शर्मिला राजू** यांची पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या शिक्षण समितीचे **उपसभापती** पदावर रितसर वैधरित्या बिनविरोध निवड झाल्याचे जाहिर करणेत येत आहे.

---------

ठराव क्रमांक - ०३ विषय क्रमांक - ०३

दिनांक - ०९/०७/२०१८ विभाग – नगरसचिव

सुचक : मा.शर्मिला बाबर अनुमोदक : मा.सुवर्णा बुर्डे

संदर्भ :- मा.शर्मिला बाबर, मा.सुवर्णा बुर्डे यांचा प्रस्ताव –

मा.शिक्षण समितीची सभा प्रत्येक महिन्याच्या १ ल्या व ३ –या गुरुवारी दुपारी २.०० वा. विशेष समिती सभागृहात भरविण्यात यावी. तथापी सदर दिवशी कार्यालयास सुट्‌टी/सुट्‌टया असलेस त्या सुट्‌टी/सुट्‌टयांनंतर येणारे कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी दुपारी २.०० वा. सभा भरविण्यात यावी. तसेच कोणीही सन्मा.सदस्य उपस्थित नसल्याने होऊ न शकणारी सभा मा.सभापती निश्चित करतील त्या दिवशी व त्या वेळी भरविण्यात यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

**(मा.प्रा.सोनाली दत्तात्रय गव्हाणे)**
**सभापती**
शिक्षण समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/४२८/२०१८
दिनांक : ०९/०७/२०१८



**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८.

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.